# दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.,मुंबई.

(दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मिलीत)

प्लॉट नं.१०, टाऊन सेंटर, सिडको,

प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद.

## जाहिर वाहन विक्री

| अ. क्र. | वाहन क्रमांक | मेक | मॉडेल | राखीव किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | एम.एच ४३ ए.बी.८४५१ | स्विफ्ट डिझायर (डिझेल) | जुलै २०१० | २,००,०००/- |

**जाहिर लिलावाच्या अटी /शर्ती :-**

१. बँकेच्या मालकीचे वरील वाहन "जसे आहे तशी " या तत्वावर विक्रीसाठी ठेवण्यांत येत आहे.

२. जाहिर लिलाव बँकेच्या प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद येथे दि.१५/०१ /२०१९ दुपारी २.३० वाजता

३. वाहन तपासणी दि.०८/०१/२०१९ ते दि.१४/०१/२०१९ रोजी कार्यालयीन वेळेत (सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.०० (सोमवार ते शनिवार ) व दुसरा व चौथा शनिवार सोडून या वेळेत बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाच्या वरील पत्त्यावर करता येईल.

४. जाहिर लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रु.१००००/ (रुपये दहा हजार मात्र) दि.महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद रोखीने दि.१५/०१/२०१९ रोजी दु.१.०० वाजे पर्यंत जमा करावी. सदर रक्कम बँकेकडे दुपारी १.०० वाजेपर्यंत जमा केल्याशिवाय लिलाव प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. सदर जमा केलेली रक्कम लिलाव प्रक्रिया कायम न झाल्यास व बँकेने जाहिर लिलाव रद्द केल्यास परत करण्यांत येईल. मात्र सदर रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

५. यशस्वी लिलावधारकांस बयाणा म्हणून जाहिर लिलावाच्या रक्कमेच्या २५ % रक्कम (अधिक जीएसटीसह) जागेवरच रोखीने बँकेत भरावी लागेल. तथापी यशस्वी लिलावधारकाने वाहन खरेदी न केल्यास बयाणा रक्कम परत मिळणार नाही.

६. जाहिर लिलाव यशस्वी झाल्यावर खरेदीदाराने १५ दिवसांचे आत उर्वरीत ७५% रक्कम (अधिक जीएसटी) रोख भरुन वाहन ताब्यात घ्यावे लागेल. (उपरोक्त मुदतीत रक्कम न भरल्यास बयाणा रक्कम परत मागण्याचा अधिकार संबंधीतास राहणार नाही. तसेच सदरच्या रक्कमेवर कोणत्याही परिस्थितीत व्याज दिले जाणार नाही.)

७. जाहिर लिलावात कमाल रक्कम असणाऱ्या खरेदीदारास अंतिम निर्णय त्याच दिवशी कळविला जाईल.

८. परिवहन कार्यालयाकडून वाहनाचे " मालकी हक्क हस्तांतरण करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी वाहन खरेदीदाराची राहील. वाहनाचे हस्तांतरणाची नोंदणी होईपर्यंत बँकेने स्विकारलेली रु.१००००/- अनामत रक्कम बँकेकडे जमा राहील.

९. खरेदीदाराने वाहन स्वतःचे नांवावर नोंदणीकृत केल्यानंतर वाहनाच्या आर.सी. (स्मार्ट कार्ड)/टी.सी. पुस्तकातील मालकी हक्क हस्तांस्तरणाबाबतच्या नोंदीची झेरॉक्स प्रत या कार्यालयास सादर करावी लागेल. सोबत मुळ पुस्तके पाहणीसाठी आणावी लागतील.

१०. वाहनाचे विक्री किंमतीनुसार जीएसटी खरेदीदारास भरावा लागेल.

११. जाहिर लिलावात अपेक्षेप्रमाणे किंमत न आल्यास किंवा कोणतेही कारण न देता वाहनाचा लिलाव रद्द करण्याचे अधिकर बँक राखून ठेवीत आहे.